# महाराष्ट्र शासन

# निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय,

## महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली-११०००१.

क्र.निआ/आस्था/५८-IV/२०२५, दिनांक ११.०६.२०२५

**निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या आस्थापनेवरील सहाय्यक निवासी आयुक्त (संपर्क व गुंतवणूक) (वेतनस्तर-एस-२३ रु. ६७७००-२०८७००) हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत**

निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहायक निवासी (संपर्क व गुंतवणूक) (वेतनस्तर-एस-२३ रु. ६७७००-२०८७००) हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता, मंत्रालयीन विभागातील अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून किंवा अवर सचिव पदाच्या समकक्ष पदावर कार्यरत क्षेत्रिय अधिकाऱ्यांमधून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

उपरोक्त पदासाठी प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छुक अधिकाऱ्यांनी परस्पर या कार्यालयाकडे अर्ज सादर करू नयेत. त्यांनी आपापल्या विभागांमार्फत अर्ज सादर करावेत. परस्पर अर्ज सादर केल्यास त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

इच्छुक अधिकारी यांनी निवासी आयुक्त कार्यालयाच्या www.maharashtrasadan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संबंधित पदाकरिता असलेल्या जाहिरातीमध्ये जोडण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये माहिती भरून व मागील पाच वर्षांच्या परिपूर्ण गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रतीसह आपला अर्ज या कार्यालयाकडे दिनांक २७.०६.२०२५ पर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवावा.

(स्मिता शेलार)

सहाय्यक निवासी आयुक्त (प्रशासन)